“मिशन २ ऑक्टोबर, २०१९”
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना किमान “३ स्टार मानांकन” व “ओडीएफ+” दर्जा प्राप्त करून घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : स्वमअ-२०१९/प्र.क्र.८२/नवि ३४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ मे, २०१९

पहा :

१. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि ३४ दिनांक १५.०५.२०१५
२. शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र.४१/नवि-३४, दिनांक २९.०४.२०१७

प्रस्तावना :

देशातील सर्व शहरांमधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करिता या शहरांना स्वच्छतेची आणि या शहरांमधील सर्व नागरीकानां शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देवून हे ध्येय गाठण्यासाठी केंद्र शासन, **दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मदिनापर्यंत म्हणजे दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत** “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” **संपूर्ण देशामध्ये राबवित आहे.** केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” च्या धर्तीवर संदर्भीय क्रमांक (१) येथील दिनांक १५ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)”ची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ज्या कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही आशा कुटुंबांना वैयक्तिक अथवा सामुदायीक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देवून शहरे **“हागणदारी मुक्त”** (ओडीएफ) करणे व घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत शहरांमधील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करून शहरे **“स्वच्छ”** करणे या दोन प्रमुख बाबीचा स्वच्छ **भारत अभियानामध्ये** समावेश आहे.

३. स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी करून राज्याचा नागरी भाग दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी **हागणदारी मुक्त** घोषित करण्यात आला असून, या शहरांच्या हागणदारी मुक्त दर्जामध्ये सातत्य रहावे व शहरांतील कुटुंबांना शौचालयाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने आता या सर्व शहरांना “ओडीएफ+” व “ओडीएफ++” दर्जा प्राप्त करावयाचा आहे.

४. स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत शहरांमधील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्य शासनाचे धोरण संदर्भिय क्रमांक (२) येथील दिनांक २९.४.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये जाहिर करून दिनांक १ मे, २०१७ पासून कचऱ्याचे निर्मितीच्या जागी वर्गीकरण करण्याची मोहिम **“कचरा लाख मोलाचा”** या शिर्षकाखाली राबविण्यात येत आहे.

५. राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था "ओडीएफ", "ओडीएफ+" व "ओडीएफ++" होण्यासाठी तसेच, शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन योग्य रितीने होण्यासाठी शासनाने मागील काही वर्षामध्ये आवश्यक निधीसह मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. परंतु, जानेवारी, २०१९ मध्ये केंद्र शासनाने केलेल्या "ओडीएफ+" व "ओडीएफ++" च्या तपासणीत राज्यातील ३८४ शहरांपैकी फक्त ९ शहरांना "ओडीएफ++" व १४२ शहरांना "ओडीएफ+" दर्जा मिळविता आला आहे. तर, कचरा मुक्त शहरांच्या तारांकीत मानांकनामध्ये राज्यातील ३८४ शहरांपैकी फक्त २६ शहरांना "३ स्टार मानांकन" मिळविता आले आहे.

६. स्वच्छ भारत अभियानाचा कालावधी हा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मदिनापर्यंत म्हणजे दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत असल्याने, राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत किमान **"ओडीएफ+"** हा दर्जा व कचरा मुक्त शहरांच्या तारांकीत मानांकनामध्ये किमान **"३ स्टार मानांकन"** मिळविण्याचे उद्दिष्ट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

प्रस्तावनेत नमूद केलेले विवेचन लक्षात घेता, स्वच्छ भारत अभियानाचा कालावधी हा **राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मदिनापर्यंत म्हणजे दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत असल्याने, या कालावधीत म्हणजे दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाने नेमलेल्या त्रयस्त संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या तपासणीत किमान "ओडीएफ+"** हा दर्जा व कचरा मुक्त शहरांच्या तारांकीत मानांकनामध्ये किमान **"३ स्टार मानांकन"** मिळविण्याचे उद्दिष्ट देण्यात येत आहे.

२. सदर उद्दिष्ट विहित कालावधीत पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आयुक्त, महानगरपालिका तसेच मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांची राहील. या कालावधीत ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था "ओडीएफ+" हा दर्जा व "३ स्टार मानांकन" प्राप्त करू शकणार नाहीत, त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आयुक्त, महानगरपालिका तसेच मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात तसे प्रतिकुल शेरे नोंदविण्यात येतील.

३. जिल्हाधिकारी यांनी जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे पालक म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना उपरोक्त प्रमाणे उद्दिष्ट पूर्ण करता यावे यासाठी त्यांच्यामार्फत करण्यात येत असलेल्या कामाचा वेळोवेळी आढावा घेवून त्यांना मार्गदर्शन करावे व जिल्हयातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था सदर उद्दिष्ट विहित कालावधीत पूर्ण करतील याची दक्षता घ्यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०५२४१७०३०७४७२५ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas Madhukar Badhan

Digitally signed by Kailas Madhukar Badhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=22804d8f98c03e9a67ca8eca6a02e7eaab4bcc4a3d59dfce4f1c7189ab74b085, serialNumber=e83c1c73de120837488d76379734db4868992e2b35ba1df8cfea9650fcff780f, cn=Kailas Madhukar Badhan
Date: 2019.05.27 13:06:10 +05'30'

(कैलास बधान)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) महापौर, महानगरपालिका (सर्व)
४) नगराध्यक्ष, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) विभागीय आयुक्त (सर्व)
८) आयुक्त, तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) आयुक्त, सर्व महानगरपालिका
११) राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई
१२) प्रादेशिक उप संचालक, नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
१३) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१४) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
१५) निवडनस्ती, नवि-३४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.